[विशेष-ब, ना. (मु. गा. पि.) ५५ म.

№ 486278

# नोंदणी प्रमाणपत्र

संस्था नोंदणी अधिनियम, १८६०

(१८६० चा अधिनियम, २१)

नोंदणी क्रमांक महा/९३७१/ना २८/१०/२०१६

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, माळी विद्यार्थी संस्था निफाड ता. निफाड, जि. नाशिक.

खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरित्या नोंदणी करण्यात आली.

तारीख : २८/१०/२०१६ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

संस्थांचे [illegible] निबंधक,

सहाय्यक संस्था निबंधक

नाशिक प्रदेश नाशिक

Scanned by CamScanner

अर्ज क्र. 2986/16
अर्जदाराचे नांव अॅड. प्रशांत गांभीरे
भरलेले सेवा शुल्क रुपये: 40/-
सेवे भरल्याचा दिनांक : 19/12/16

महा/13709/ना
28/10/2016

सहाय्यक संस्था निबंधक
नाशिक प्रदेश नाशिक

# परिशिष्ट ब

माजी विद्यार्थी संस्था, निफाड,ता. निफाड,जि. नाशिक

या संस्थेचे मेमोरंडम ऑफ असोशिएशन(निवेदनपत्र/ज्ञापन)

| | |
|---|---|
| संस्थेचे नाव | माजी विद्यार्थी संस्था, निफाड,ता. निफाड,जि. नाशिक |
| द्वारा | प्राचार्य , मराठा विद्या प्रसारक मंडळ कॉलेज, घर नं.१०८१/३१, निफाड, ता. निफाड, जि. नाशिक |

३. संस्थेचे कार्यक्षेत्र :- महाराष्ट्र राज्य

४. प्रास्ताविक पुढील नमूद व्यक्तींनी एकत्र येउन बहुउद्देशिय व सामाजिक या क्षेत्रात काम करण्यासाठी सदर संस्था स्थापन करीत आहेत. तिचे ध्येय्य व उद्देश संस्था नोंदणी अधिनियमाचे कलम २० प्रमाणे राहतील .

५. संस्थेचे ध्येय्य व उद्देश

१.सामाजिक :-

१.गोरगरीब,अंध अपंग, महिलांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करणे, त्यासाठी आवश्यक त्या कार्यक्रमांचे आयोजन करणे.

२.महिलांसाठी सेवाभावी संस्था म्हणून काम करणे,त्यांना आरोग्य,कल्याण,शिक्षण या क्षेत्रातील प्रकल्पांचा लाभ मिळवून देणे, त्यांना मार्गदर्शन करणे, मार्गदर्शन कक्षाची सोय करणे.

३.मुकबधीर, अपंग, अंधशाळा, बाळगृह, वसतीगृह, वृध्दाश्रम, अनाथाश्रम, आधाराश्रम, आश्रमशाळा, सुरु करणे, त्याचे व्यवस्थापन करणे. महिलांना सक्षम,सजग,समृध्द करण्यासाठी विविध सेवाभावी उपक्रम राबविणे, त्याची माहिती देणे,त्यासाठी शिक्षण-प्रशिक्षण देणे.त्यांना कायदेतज्ञांद्वारे माहिती देणे..बालके,विद्यार्थी,युवक,युवती,महिला,जेष्ट नागरिक,यांच्यासाठी सेवाभावी उपक्रम राबविणे.त्यांच्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करणे.

२. शैक्षणिक :-

१. समाजातक्रमिक,पारंपारीक,आधुनिक,तांत्रिक,भाषिक, शिक्षणाची सोय करणे.त्यादृष्टीने शाळा,वस्तीशाळा, इंग्लीश मेडीयम बालवाडी,अंगणवाडी,प्राथमिक, पूर्वप्राथमिक,नर्सरी,विद्यालय, महाविद्यालय,आश्रमशाळा, आदीवासी शाळा,इंग्रजी तसेच अन्य माध्यमाच्या शाळा,मराठी शाळा यांची सोय करणे, त्यासाठीच्या आवश्यकत्या सेवासुविधा उपलब्ध करुन देणे. शिक्षणशास्त्र,वैद्यकीय,निमवैद्यकीय,नर्सिंग,आय.टी.आय, तांत्रिक ,तंत्रनिकेतन,शिवणकाम नेचरोपॅथी फॅशन डिझाइन इ. शिक्षणाची सोय करणे.या विषयांचे विद्यालये,महाविद्यालये यांचीसोय करणे.त्यासाठी आवश्यक त्या सुविधा निर्माण करणे.सर्वांसाठी शिक्षणाच्या तत्वाचा प्रसार-प्रचार करणे.शिक्षणाच्या क्षेत्रापासून वंचित असलेल्यांसाठी शिक्षणाची सोय करणे, त्यासाठीच्या सुविधा उपलब्ध करून देणे.

२.विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे, त्यांचा गौरव करणे.त्यांना शिक्षण,कलाविकास, आरोग्य, या सेवाभावी क्षेत्रातील उपलब्ध करुन देणे.

३.महिलांना रोजगाराभिमुख शिक्षण-प्रशिक्षण देणे, त्यासाठीचे सेवाभावी प्रकल्प उभारणे.

१. कला प्रकाराची जोपासना करणे, त्याचे शिक्षण-प्रशिक्षण देणे.त्याचे सादरीकरणाची संधी उपलब्ध करुन देणे .कलामहोत्सवांचे आयोजन करणे.

२. विज्ञान,कला,वाडमय,ललित कला यांची आवड जोपासणे, तिचे संवधंन करणे, संवर्धनार्थ प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करणे.

३. कलेचा दर्जा उंचावण्यासाठी सेवाभावाने प्रयत्न करणे, त्यासाठी आवश्यक त्या कार्यक्रमांचे आयोजन करणे,यादृष्टीनेकार्यशाळा,कला,नाट्य,व्याख्याने,चर्चासत्र,परिसंवाद,प्रशिक्षण,शिबीरियासारख्या कार्यक्रमांचे आयोजनकरणे.विविध सामाजिक संस्थाना सहाय्य करणे.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

Scanned by CamScanner

४. वैद्यकीय

१.गोरगरीबांना वैद्यकीय मदत करणे, त्यासाठी तपासणी,निदान,शस्त्रक्रिया शिबीरांचे आयोजन करणे, दवाखाना, रुग्णालयाची सोय करणे, रुग्णवाहिकेची सोय करणे, आरोग्याबाबत जनजागृती करणे. असाध्य रोगांबाबत जनजागृती करणे, त्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे.

२. वैद्यकीय सेवा समाजातील गोर गरीब लोकांना उपलब्ध करुर देणे. हॉस्पीटल स्थापन करण. फिरते दवाखाने, चॅरिटेबल हॉस्पीटल स्थापन करणे. व सुरु करणे.

३. रोग चिकित्सा शिबीर, तज्ञ डॉक्टरांचे संमेलन,वैद्यकीय शिबीरे चर्चासत्रे आयोजीत करणे, रिसर्च सेंटर उघडणे व कॅन्सर व एड्स पिडीतांना मोफत उपचार करणे.अभियांत्रिकी,
शिक्षणशास्त्र,वैद्यकीय,निमवैद्यकीय,तांत्रिक शिक्षणाची सोय करणे.या विषयांचे विद्यालये,महाविद्यालये यांचीसोय करणे.त्यासाठी आवश्यक त्या सुविधा निर्माण करणे.सर्वांसाठी शिक्षणाच्या तत्वाचा प्रसार-प्रचार करणे.

४. महिला,युवती,मुले यांना शिक्षण,ज्ञानविज्ञान क्षेत्रातील तसेच डॉक्टरांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळवून देणे.

५. क्रिडा-सांस्कृतिक

१. समाजात खिलाडूवृत्ती जोपासणे, त्यासाठी शासनमान्यताप्राप्त क्रीडा प्रकारांचे शिक्षण-प्रशिक्षण देणे. खेळाविषयी मार्गदर्शन करणे,प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करणे.

२. शासनमान्यताप्राप्त खेळ महोत्सव स्पर्धांचे आयोजन करणे,त्यासाठी आवश्यक त्या उपक्रमांचे आयोजन करणे.

३. परिसरात क्रीडांगण,व्यायामशाळेची सोय करणे, व्यायामाची शिकवण देणे, आरोग्य संवर्धनासाठी व्यायामाची सवय लावणे, व्यायामशाळेसाठी आवश्यक सेवासुविधा उपलब्ध करुन देणे.त्यासाठी सेवाभावाने प्रयत्न करणे.

४. शासनमान्यताप्राप्त प्रकारच्या खेळांबाबत जाणीवजागृती करणे.तालीमीची व्यवस्था करणे,परिसरातील खेळाडूंना आवश्यक त्या सेवासुविधा उपलब्ध करून देणे, स्पर्धांचे आयोजन करणे.

५. क्रिडाक्षेत्रात काम करणाऱ्यांचा गौरव करणे, त्यांना सन्मानित करणे.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

Scanned by CamScanner

६. **माजी विद्यार्थी संस्था, निफाड,ता. निफाड,जि. नाशिक** या संस्थेच्या नियम व नियमावलीप्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदरह् संस्थेची व्यवस्था व कारभार सोपविण्यात आला आहे, अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संपूर्ण नावे,पत्ते,हुद्दे,वय,व्यवसाय,राष्ट्रीयत्व खालीलप्रमाणे :-

| अ.क्र | नाव व पत्ता | हुद्दा/पद | व्यवसाय | वय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैकुंठ विजय पाटील<br>रा. कुंदेवाडी, ता. निफाड,जि. नाशिक | अध्यक्ष | नोकरी | ३८ | भारतीय |
| २. | दिपक जयनारायण श्रीवास्तव<br>रा. शिवाजी चौक, निफाड,ता.निफाड,जि. नाशिक | उपाध्यक्ष | नोकरी | ५२ | भारतीय |
| ३. | ॲड. प्रविण नामदेवराव ठाकरे<br>रा.निफाड, ता. निफाड,जि. नाशिक | सचिव | नोकरी | ४६ | भारतीय |
| ४. | श्रीमती. पल्लवी चंद्रकांत खापरे<br>रा.कुंदेवाडी,ता. निफाड, जि. नाशिक | सहसचिव | गृहिणी | २४ | भारतीय |
| ५. | दिलीप दत्तु कापसे<br>रा. निफाड,ता. निफाड,जि. नाशिक | कोषाध्यक्ष | नोकरी | ४९ | भारतीय |
| ६. | माधव पुंजाजी सुरवाडे<br>रा. मु.पो. पिंपळस(रामाचे)ता.निफाड, जि. नाशिक | सदस्य | नोकरी | ४३ | भारतीय |
| ७. | शंकर देवराम सांगळे<br>रा.मु.शिवडी, पो. उगाव,ता. निफाड, जि. नाशिक | सदस्य | नोकरी | ३५ | भारतीय |

नाशिक
दि..१./१./२०१६

अध्यक्ष

उपाध्यक्ष

सरचिटणीस

Scanned by CamScanner

७. माजी विद्यार्थी संस्था, निफाड,ता. निफाड,जि. नाशिक सदस्य जाहीर करतो की,नोंदणी संस्था अधिनियम १८६० प्रमाणे अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येउन वरील संस्था आज दि. ..9/9../२०१६ रोजी स्थापन केली असून ती नोंदणी संस्था अधिनियम १८६० प्रमाणे नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

| अ.क्र | नाव | हुद्दा/पद | सही |
|---|---|---|---|
| १ | वैकुंठ विजय पाटील | अध्यक्ष | [signature] |
| २. | दिपक जयनारायण श्रीवास्तव | उपाध्यक्ष | [signature] |
| ३. | अँड. प्रविण नामदेवराव ढाकरे | सचिव | [signature] |
| ४. | श्रीमती. पल्लवी चंद्रकांत खापरे | सहसचिव | [signature] |
| ५. | दिलीप दत्तु कापसे | कोषाध्यक्ष | [signature] |
| ६. | माधव पुंजाजी सुरवाडे | सदस्य | [signature] |
| ७. | शंकर देवराम सांगळे | सदस्य | [signature] |

नाशिक
दि. 9../9.../२०१६

सदर व्यक्तींना मी ओळखतो. आज रोजी सह्या केल्या आहेत.

ATTESTED
Adv. B.H Gambhire(Notary)

दिपक जयनारायण श्रीवास्तव

अध्यक्ष

उपाध्यक्ष

सरचिटणीस

सत्यप्रत
23.12.16
प्र. निरीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नाशिक विभाग नाशिक



Scanned by CamScanner

अर्ज क्र. २२४५/१८
स्वीकारल्याचा दिनांक २९/१२/१८
भरावयाची सेवा शुल्क रुपये १०/-
पैसे भरल्याचा दिनांक १९/१२/१८

महा/९१०७/ना
१८/१०/२०१८
सहाय्यक संस्था निबंधक
नाशिक प्रदेश नाशिक

परिशिष्ट क

नियम व नियमावली

माजी विद्यार्थी संस्था, निफाड,ता. निफाड,जि. नाशिक

या संस्थेची नियम व नियमावली

१. नियमावलीतील संदर्भित शब्दांची व्याख्या :-

१.१ संस्था म्हणजे माजी विद्यार्थी संस्था, निफाड,ता. निफाड,जि. नाशिक ही संस्था होय.

१.२ अध्यक्ष म्हणजे माजी विद्यार्थी संस्था, निफाड,ता. निफाड,जि. नाशिक या संस्थेचा अध्यक्ष होय.

१.३ उपाध्यक्ष म्हणजे माजी विद्यार्थी संस्था, निफाड,ता. निफाड,जि. नाशिक उपाध्यक्ष होय.

१.४ सचिव म्हणजे माजी विद्यार्थी संस्था, निफाड,ता. निफाड,जि. नाशिक या संस्थेचा सचिव होय.

१.५ सहसचिव म्हणजे माजी विद्यार्थी संस्था, निफाड,ता. निफाड,जि. नाशिक या संस्थेच्याकार्यकारीणीचा सहसचिव होय.

१.६ कोषाध्यक्ष म्हणजे माजी विद्यार्थी संस्था,निफाड,ता.निफाड,जि.नाशिक या संस्थेच्या कार्यकारीणीचा कोषाध्यक्ष होय.

१.७ सदस्य,सभासद म्हणजे माजी विद्यार्थी संस्था, निफाड,ता. निफाड,जि. नाशिक या संस्थेच्या कार्यकारीणीचे सदस्य, सभासद होय.

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक विभाग

२. कार्यक्षेत्र :- महाराष्ट्र राज्य

३. हिशेबाचे वर्ष
दि. १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

४. सभासदत्व व त्याच्या नोंदणीची पध्दत
वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या कायद्याने सज्ञान असलेल्या कुणाही भारतीय व्यक्तीस या संस्थेचे सभासदत्व प्राप्त करता येईल. सदर व्यक्ती परिसरातील रहिवाशी असावी .त्या व्यक्तीला संस्थेकडे रितसर अर्ज करावा लागेल. सभासदत्वाच्या अर्जावर अध्यक्षांची सही आवश्यक राहील.तो अर्ज मंजूर वा नामंजूर करण्याचा वा त्यावर योग्य तो निर्णय घेण्याचा अधिकार कार्यकारीणीस राहील.त्याबाबत तक्रार करता येणार नाही. अर्जाला कार्यकारीणीने मंजूरी दिल्यानंतर सभासदाची वर्गणी भरुन घेउन त्याची नोंद सभासदाच्या यादीत करण्यात येईल.

५. सभासदांचे प्रकार(वर्गवारी)
सभासदांचे दोन प्रकार राहतील.

अ) आजीव सभासद :- संस्थेला एकरकमी एकाचवेळी रु.५००/-(पाचशे फक्त) सभासद वर्गणी देणारी व्यक्ती आजीव सभासद होईल.

ब) सर्वसाधारण वार्षिक सभासद :- संस्थेला ५०/-(पन्नास फक्त) सभासद वर्गणी देणारी व्यक्ती सर्वसाधारण वार्षिक सभासद होईल.

६. सभासदत्व रद्द होणे
कोणत्याही सभासद कायदेशीर गुन्हेगार ठरल्यास वा,सभासद वर्गणी न दिल्यास वा, मृत्यु पावल्यास वा, देश सोडून गेल्यास वा, गैरवर्तणूक करीत असल्यास वा, संस्थेला नुकसान पोहोचवित असल्यास वा,राजीनामा दिल्यास,, कार्यकारी मंडळाने बहुमताने ठराव करुन काढून टाकल्यास सभासदत्व रद्द समजले जाईल.

७. सर्वसाधारण सभा,तिचे अधिकार आणि तिचे कार्य
सर्वसाधारण सभा ही संस्थेची सर्वोच्च व शेवटचा निर्णय देणारी सभा राहील.ही सभा वर्षातून किमान एक वेळा नियमानुसार घेतली जाईल. त्यात सर्व प्रकारचे सभासद भाग घेउ शकतील.कार्यकारी मंडळाच्या कार्यावर नियंत्रण ठेवणे,त्याबाबत आदेश देणे, वार्षिक हिशेब मंजूर करणे, अंदाजपत्रकास मंजूरी देणे, आवश्यकतेनुसार नियमात बदल करणे, यासह वेळेवर येणारे तसेच संदर्भात सर्व निर्णय घेण्यास सर्वसाधारण सभा सक्षम राहील.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सरचिटणीस



Scanned by CamScanner

८.    सर्वसाधारण सभेची सुचना व गणसंख्या

सर्वसाधारण सभेची सूचना सर्व सभासदांना सभेपूर्वी किमान १५ दिवस अगोदर देणे बंधनकारक राहील. या सूचनेत(अजेंड्यात)दिनांक,वेळ,स्थळ,सभेचे विषय नमूद असले पाहीजेत. ही सूचना टपालाद्वारे वा संस्थेच्या पुस्तकात सही घेउन देता येईल.गणसंख्या एकुण सभासद संख्येच्या २/३ इतकी राहील.गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास नंतर घेण्यात येणाऱ्या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही. मात्र तशी टीप सभेच्या सूचनेत असली पाहीजे.

९.    विशेष सर्वसाधारण सभा व तिचे कार्य

अशी सभा आवश्यकतेनुसार केव्हाही घेता येईल. सर्वसाधारण सभा करु शकते अशी सर्व कार्ये करण्याचा अधिकार या सभेला राहील.

१०.    संस्थेचे कार्यकारी मंडळ,पदाधिकारी यांची रचना

संस्थेच्या कार्यकारी मंडळात किमान ७ व जास्तीत जास्त ११ पदाधिकारी राहतील.त्यात अध्यक्ष १,उपाध्यक्ष १, सचिव१, सहसचिव १, कोषाध्यक्ष १,व उर्वरीत सर्व सदस्य असतील.

११.    कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ व त्याच्या निवडीची पध्दत

कार्यकारी मंडळाचा कार्यकाल ५ वर्षाचा राहील. निवडणुकीची पध्दत सर्वसाधारण सभेत गुप्त मतदान वा बहुमताने निवडीची राहील. समसमान मतं पडल्यास एक कास्टींग मत देण्याचा अधिकार अध्यक्षांना राहील.

१२.    कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांनी कार्ये

अध्यक्ष - सभेचे अध्यक्षस्थान स्विकारून कामकाज चालविणे, संस्थेच्या कारभारावर नियंत्रण ठेवणे, संस्थेसंदर्भात योग्य ते आदेश देणे.संस्थेच्या सभा बोलावणे, निर्णय घेणे.ठरावांची अंमलबजावणी करणे,संस्थेचे कागदपत्र तयार करणे, त्याचे रक्षण करणे.समसमान मत पडल्यास एक कास्टिंग मत देण्याचा अधिकार अध्यक्षांना राहील.

उपाध्यक्ष- अध्यक्षांना संस्थेच्या कामात मदत करणे. त्यांच्या अनुपस्थितीत परवानगीने अध्यक्ष म्हणुन कामकाज पाहणे.

सचिव - ठरावांची अंमलबजावणी करणे,संस्थेचे कागदपत्र तयार करणे, त्याचे रक्षण करणे.संस्थेचा पत्र व्यवहार करणे,किरकोळ नियम तयार करणे, कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवणे, कोर्टकचेरीची कामे करणे,इतिवृत्त लिहीणे.

सहसचिव- सचिवांच्या कामात मदत करणे.त्यांच्या अनुपस्थितीत परवानगीने सचिव म्हणुन कामकाज पाहणे.

कोषाध्यक्ष - संस्थेची हिशेबपत्रके तयार करणे, त्यांचे लेखापरीक्षण करून घेणे,संस्थेचे हिशेब ठेवणे,मालमत्तेची नोंद ठेवणे, रक्कम अदा करणे वा स्विकारणे.

सदस्य,सभासद- संस्थेच्या कामात योग्य ती मदत करणे, सभेस उपस्थित राहणे, निवडणुकीत मतदान करणे.

१३    कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा

कार्यकारी मंडळाच्या वर्षातून दोन सभा घेण्यात येतील. संस्थेच्या २/३ सभासदांनी मागणी केल्यास १५ दिवसांच्या आत अध्यक्षांनी वा सचिवांनी कार्यकारी मंडळाची सभा बोलावणे बंधनकारक राहील.या सभेला कार्यकारी मंडळाच्या सभेचे सर्व अधिकार राहतील.

१४    कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना व गणसंख्या

कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना सर्व सभासदांना सभेपूर्वी किमान ७ दिवस अगोदर देणे बंधनकारक राहील.या सूचनेत(अजेंड्यात)दिनांक,वेळ,स्थळ,सभेचे विषय नमूद असले पाहीजेत. ही सूचना टपालाद्वारे वा संस्थेच्या पुस्तकात सही घेउन देता येईल.गणसंख्या एकुण सभासद संख्येच्या २/३ इतकी राहील.गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास नंतर घेण्यात येणाऱ्या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही. मात्र तशी टीप सभेच्या सूचनेत असली पाहीजे.

१५.    कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम

कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम सर्वसाधारण सभा ठरविल त्याप्रमाणे राहतील.सभासद वर्गणी बाकी असणाऱ्या सभासदास निवडणुकीत उमेदवारी करता येणार नाही तसेच मतदान करता येणार नाही.

१६.    कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत

कार्यकारी मंडळातील कोणतेही पद काहीही कारणास्तव रिक्त झाल्यास उर्वरीत कार्यकारी मंडळ अध्यक्षांच्या संमतीने सभा बोलावून रिक्त पद/पदे भरु शकेल. सहा महिन्यात सदर पद/पदे न भरल्यास सदर पदे भरण्याचा अधिकार मे. सहाय्यक धर्मदाय आयुक्त नाशिक विभाग यांना राहील.

१७    कार्यकारी मंडळाचे अधिकार व कामे

कार्यकारी मंडळ संस्थेच्या कारभारावर नियंत्रण ठेवील,सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या ठरावांची अंमलबजावणी करील.संस्थेचे कामकाज सुचारु पध्दतीने चालावे यासाठी किरकोळ नियम तयार करील,आवश्यकतेनुसार त्यात बदल करता येईल.एखाद्या कार्यासाठी समिती नेमू शकेल, त्यानंतर ती समिती रद्द करु शकेल, संस्थेच्या शाखा

अध्यक्ष    उपाध्यक्ष    सरचिटणीस



Scanned by CamScanner

कार्यालयांना मान्यता देणे,ती काढून घेणे.संस्थेच्या कायदेशीर बाबी पूर्ण करणे, हिशेब ठेवणे, देयके मंजूर करणे, देणे, तक्रारींची दखल घेणे, रिक्त पदे भरणे, सभासदांना मंजूरी देणे, सभासदत्व नामंजूर करणे,सभासदास काढून टाकणे अशी वेळोवेळी आवश्यक ती सर्व कामे कार्यकारी मंडळ करील.

१८. **संस्थेचा निधी, मिळकत व विनीयोग**

सभासद वर्गणी, देणगी, वर्गणी, फी, अनुदान व विविध उपक्रमातून येणारा निधी हे संस्थेचे उत्पन्नाचे साधन राहील.संस्थेच्या ध्येय्य उद्देशानुसार विधायक मार्गाने निधी गोळा करता येईल, तो स्थावर स्वरुपाच्या मिळकतीत गुंतविता येईल.

१९. **उद्दीष्टनिहाय खर्चाची तरतूद**

ज्या उद्देशाने रकम जमा केली असेल त्या उद्देशावर १०० टक्के खर्च करता येईल.

२०. **कर्ज व ठेवी यासंबंधी तरतूद**

संस्थेला आवश्यकता भासल्यास कोणत्याही व्यक्तीकडून,संस्थेकडून वा बँकेकडून मे. धर्मदाय सह आयुक्त सो. नाशिक विभाग नाशिक यांच्या परवानगीने कर्ज वा ठेवी स्विकारता येतील.

२१ **स्थावर मालमत्ता खरेदी-विक्री करण्याबाबतची तरतूद**

संस्थेला आवश्यकता भासल्यास मालमत्ता खरेदी करता येईल. त्यासाठी कार्यकारी मंडळाची बहुमताने मान्यता घ्यावी लागेल. स्थावर मालमत्ता विक्री करावयाची असल्याने मे. धर्मदाय सह आयुक्त सो. नाशिक विभाग नाशिक यांची परवानगी घ्यावी लागेल.

२२. **बँक खाते**

संस्थेची शिल्लक रकम कोणत्याही राष्ट्रीयीकृत, सहकारी अथवा मान्यताप्राप्त बँकेत संस्थेच्या नावाने ठेवता येईल.संस्थेच्या वतीने सदर खात्याचे व्यवहार करण्यासाठी अध्यक्ष व उपाध्यक्ष अथवा सचिव अशा तीन पैकी दोन पदाधिकाऱ्यांच्या सह्या आवश्यक राहतील.या दोन पदाधिकाऱ्यांच्या संयुक्त सहीने रकम काढता येईल.

२३ **सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत**

संस्था नोंदणी संस्था अधिनियम १८६० प्रमाणे कलम १५ [illegible] प्रमाणे संस्थेच्या सर्व सभासदांची यादी संस्था नोंदणी नियमावली १९७१ च्या [illegible] १५ प्रमाणे सह्यांसह विहीत नमुन्यात ठेवण्यात येईल.नोंदणी संस्था अधिनियम १८६० प्रमाणे कलम ४ व संस्था नोंदणी नियम ७ प्रमाणे दरवर्षी कार्यकारी मंडळाची यादी अनुसूची १ च्या नमुन्यात सहाय्यक निबंधकांचे कार्यालयात पाठविली जाईल.

२४. **नियम व नियमावलीत बदल करण्याची तरतूद**

संस्थेच्या नियम व नियमावलीत बदल करावयाचा असल्यास विशेष सर्वसाधारण सभेत संस्थेच्या सभासदांपैकी ३/५ सभासदांच्या मान्यतेने बहुमताने ठराव करुन नियम व नियमावलीत बदल केला जाईल. सदर सभेपूर्वी दहा दिवस अगोदर सर्वांना अजेंडा दिला जाईल. त्यांनतर संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या कलम १२ प्रमाणे कार्यवाही केली जाईल.

२५. **संस्थेच्या नावात , उद्देशात बदल करण्याची तरतूद**

संस्थेच्या नावात ,उद्देशात अथवा कोणताही तत्सम बदल करावयाचा झाल्यास वा दोन संस्थाचें विलीनीकरण करावयाचे झाल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० प्रमाणे कलम १२ वा १२अ प्रमाणे कार्यवाही केली जाईल.सदर बदल करावयाचा असल्यास विशेष सर्वसाधारण सभेत संस्थेच्या सभासदांपैकी ३/५ सभासदांच्या मान्यतेने बहुमताने ठराव करुन नियम व नियमावलीत बदल केला जाईल. सदर सभेपूर्वी दहा दिवस अगोदर सर्वांना अजेंडा दिला जाईल.

२६. **विसर्जन**

संस्थेचें विसर्जन करावयाचे झाल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० प्रमाणे कलम १३ व १४ प्रमाणे कार्यवाही केली जाईल.तत्पूर्वी सर्वसाधारण सभेत किमान ३/५ बहुमताने परवानगी घ्यावी लागेल. संस्थेच्या संदर्भातील घेणे-देणे यासह सर्व व्यवहार पुर्ण करावे लागतील.

अध्यक्ष उपाध्यक्ष सरचिटणीस

Scanned by CamScanner

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की ,सदर नियम व नियम माजी विद्यार्थी संस्था, निफाड,ता. निफाड,जि. नाशिक या संस्थेच्या नियम व नियमावलीची ...प्रत आहे.

| अ.क्र | नाव | हुद्दा/पद | सही |
|---|---|---|---|
| १ | वैकुंठ विजय पाटील | अध्यक्ष | |
| २. | दिपक जयनारायण श्रीवास्तव | उपाध्यक्ष | |
| ३. | अॅड. प्रविण नामदेवराव ठाकरे | सचिव | |
| ४. | श्रीमती. पल्लवी चंद्रकांत खापरे | सहसचिव | |
| ५. | दिलीप दत्तु कापसे | कोषाध्यक्ष | |
| ६. | माधव पुंजाजी सुरवाडे | सदस्य | |
| ७. | शंकर देवराम सांगळे | सदस्य | |

नाशिक
दिनांक:- ९।१।२०१६

अर्जदार

दिपक जयनारायण श्रीवास्तव

सत्यप्रत

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नाशिक विभाग नाशिक

Scanned by CamScanner